76

महानगरपालिका ठराव क्रमांक 8 दिनांक 20.3.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30–3 नुसार गठीत वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची सभा सोमवार दिनांक 5.6.2017 रोजी दूपारी 2.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात संपन्न झाली त्या सभेचे इतिवृत्त.

सभेत मा. सभापती श्री मनोज केशवराव चाफले, मा. उपसभापती प्रमोद ताराचंद कौरती मा. सदस्य श्री लखन सुमेरा ऐरावार, मा. सदस्य श्री विजय चुटेले, मा. सदस्या श्रीमती भावना लोणारे, मा. सदस्या श्रीमती आशा उईके, मा. सदस्या श्रीमती वंदना चांदेकर आरोग्याधिकारी व्दय तथा आरोग्य विभागाचे झोनल अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

सभेतील विषय पत्रिकेतील विषय क्रमांक 1 नुसार 11.5.2017 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवाहीला मंजूरी मिळणेबाबतच्या विषयाला मंजूरी प्रदान करण्यात आली. सभापती यांनी सांगितले की मागील सभेत सर्व दवाखान्यात कर्मचा–यांची नावे, त्यांचे फोन नंबर, त्यांच्या कामाच्या वेळा ,पद इत्यादी फलकावर नमुद करण्यात यावे या बाबत कार्यवाही झालेली नाही ती त्वरीत करण्यात यावी. सर्व दवाखान्याची स्टॉफची माहिती याची माहिती समितीचे सदस्य स्थानीय नगरसेवक यांना देण्यात यावी असे सभापती यांनी निर्देशित केले.

विषय क्रमांक 2 नुसार शहरातील लहान व मोठे नाल्याची पावसाळा पूर्वी सफाई करण्याबाबत विषयावर चर्चा करण्यात आली यावेळी सभापती यांनी होत असलेल्या कार्यवाहीचा कामाचा आढावा घेतला. विभागातर्फे माहिती देण्यात आली की 237 नाल्यापैकी 196 नाल्यांची सफाई झालेली आहे 22 वर काम चालू आहे 2 -3 दिवसात पुर्ण होतील काही मशीनचे नाले बाकी आहे. नाले सफाई संबंधात नगरसेवकांचे पत्र घेण्यात येत आहे. मा. सदस्या उईके यांनी बोरीयापुरा नाल्याची सफाई झालेली नसल्याची तक्रार केली या करीता जबाबदारी कुणाची आहे.असे विचारले. नाल्या शेजारी राहणा–या लोकांना नोटीस देण्यात यावे ते अतिक्रमण काढण्यात यावे नोटीस घेत नसल्यास नोटीस देतांना त्यांचे फोटो काढण्यात यावे. कनक व्दारे कचरा उचलण्यात येत नाही तसेच झोन डिव्हाईड झाला आहे तो कसा आहे , किती वाहने आहे कर्मचारी किती आहे याची माहिती मिळावयास हवी ते देण्याबाबत सभापती यांनी निर्देशित केले. यावेळी झोन तर्फे माहिती देण्यात आली. झोन क्रमांक 1 व्दारे 24 नाले पैकी 2 मॅनीवली तथा 2 मशीनचे नाल्याचे काम बाकी आहे झोन 2 व्दारे 26 पैकी 22 नाले झाले 4 बाकी आहे, झोन क 3 व्दारे 16 पैकी 14 झाले 2 पोकलॅन्ड चे बाकी आहे, झोन क 4 व्दारे सांगण्यात आले की 22 पैकी 17 नाले मॅनीवली आहे त्यापैकी 16 झाले आहे 2 चे काम सुरु आहे 1 बाकी आहे . झोन क 5 व्दारे सांगण्यात आले की 16 पैकी 11 मॅनीवली पुर्ण झाले आहे 5 पोकलॅन्डचे होते पैकी 4 झाले आहे. झोन क 6 व्दारे सांगण्यात आले की 51 नाले पैकी 46 झाले आहे 5 बाकी आहे. झोन क 7 व्दारे सांगण्यात आले की 22 मधील 18 झाले 4 पोकलॅन्डचे आहे. झोन क 8 मध्ये 12 पैकी 9 झाले 2 वर काम चालु आहे 1 बाकी आहे. झोन क 9 मध्ये 18

नाल्या पैकी 12 झाले 3 शिल्लक आहे झोन क्र 10 मध्ये 36 पैकी 31 झाले आहे 5 शिल्लक आहे.

यावेळी मा. सदस्य उईके यांनी बकरामंडी बाजार वस्ती येथे कचरा घराची व्यवस्था नसल्यामुळे एका जागी खुप कचरा लोक टाकतात त्यामुळे नागरिकांना खुप त्रास होतो तो कायमचा दुर करण्यासाठी कचरा घराची व्यवस्था करण्यात यावी अशी सुचना मांडल्यावरुन सभापती यांनी आरोग्याधिकारी यांना योग्य व्यवस्था करण्याचे निर्देशित केले.

विषय क्रमांक 3 नुसार म.न.पा.चे अधिकृत दहनघाटाचे देखरेख ,नियंत्रण व सौंदर्यीकरण करण्याबाबत चर्चा या विषयावर चर्चा करते वेळी सभापती यांनी निदेशित केले की सर्व दहन घाटाची, व्यवस्थेची माहिती सदस्यांना देण्यात यावी. घाटात आवश्यक व्यवस्था, अवास्तव वाढलेली झाडें ट्रिमिंग करण्यात यावे, महानगरपालिकेचे घाटावर तथा तेथील काम करणा–यांवर नियंत्रण राहीलेले नाही ते करण्यात यावे. बाहेरील लोकांचा जास्त हस्तक्षेप वाढलेला आहे तो दुर करण्यात यावा. मोक्षधाम घाटाच्या गेटची दुरुस्ती करण्यात यावी. घाटात लोक कुठेही कचरा टाकतात त्यावर नियंत्रण करण्यात यावे याकरीता योग्य उपायाचा अवलंब करण्यात यावा. घाटात दहन निशुल्क होते अंबाझरी येथे पैसे घेतले जातात यात एकसुत्रता का आणता येत नाही या बाबत अभ्यास करण्यात यावा. मोक्ष वाहीणी तथा बॉडी ठेवण्याकरीता कोल्ड मशीनीची महानगरपालिकेतर्फे ही सुविधा पुरविण्यात येवू शकते काय? या बाबत विचार करण्यात यावा असे निर्देशित करण्यात आले.

विषय क्रमांक 4 नुसार भांडेवाडी डंम्पींग यार्ड येथील रोड दुरुस्ती करणेबाबत चर्चेच्या विषयावर कच–याच्या विल्हेवाटा संबंधात काम 8–10 दिवसात पुर्ण करण्यात यावे. घरचा कचरा उचलण्याकरीता कनकने अधिकचा मॅनपावर नियुक्त करावा. किती गाडी कोणत्या झोन मध्ये आहे किती माणसे आहे गाडी नंबर इत्यादीची माहिती सदस्यांना देण्यात यावी.जितके कचरा कलेक्शन पाईन्टआहे त्याची जबाबदारी फिक्स करण्यात यावी.

कचरा पेटी वाटपाच्या संदर्भात चर्चा झाली त्यात कचरा पेटी वाटपात त्यांचे राशनकार्ड मागण्यात यावे, टॅक्स रसीद मागण्यात यावी, नगरसेवकाच्या कार्यालयातुन कचरा पेटी वाटप करण्यात यावी इत्यादी सुचना नगरसेवकांव्दारे करण्यात आल्या यावर सभापती यांनी याकरीता वरिष्ठासह यावर बोलण्यात येईल अशी सुचना दिली.

वस्तीतील गडर लाईनीच्या साफसफाईवर लक्ष देण्यात यावे. कुणाल होटल येथुन 10 दिवसातुन कचरा उचलला जातो सर्व हॉटेलात काय व्यवस्था आहे याबाबत माहिती देण्यात यावी असेही सभेत निर्देशित करण्यात आले.

विषय क्रमांक 5 नुसार हिवरीनगर मधील बंद असलेले मनपाचे दवाखाने सुरु करणे बाबत विषयावर विभागाव्दारे माहिती देण्यात आली की शासनाकडून 10 अधिक युपीएस ची मागणी करण्यात आली आहे ती झाल्यास योग्य व्यवस्था करण्यात येईल. वर्तमान बंद दवाखाना स्टॉक अभावी सुरु करण्यात आलेला नाही. अधिक कर्मचा–याची आवृत्तीबंधात

76

मागणी करण्यात आलेली आहे. तोपर्यंत आवश्यक असल्यास कंत्राट पध्दतीवर स्टॉफ नियुक्त करण्यात यावा असे निर्देशित करण्यात आले.

फायलेरीया मलेरीया विभागाच्या कर्मचा–यांना एकदाच पूर्ण औषध देण्यात यावे त्यामुळे ते वारंवार औषधे घेण्यास जाणार नाही अधिक काम होईल. असे सुचविण्यात आले.

मा. सदस्य कुटुंले यांनी आयसोलेशन दवाखान्याचे जागेवर तथा कर्मचारी वसाहतीच्या जागेवर सेवानिवृत्त कर्मचारी आजही राहत आहे जागा मोठी आहे योग्य नियोजनबध्द पध्दतीने बांधणी केल्यास अधिक कर्मचा–यांचे निवास तथा दवाखाना निर्माण होवू शकतो म्हणून याबाबत योग्य विचार करण्यात यावा असे सुचविले

नोंदणी परवाना शुल्कासंबंधात नस्तीचे फॉलोअप घेण्यात यावे. असेही सभेत निर्देशित करण्यात आले.

यानंतर सभापती यांनी सभेच्या समापनाची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| निगम सचिव | सभापती |
| नागपूर महानगरपालिका,नागपूर | वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची |

महानगरपालिका ठराव कमांक 8 दिनांक 20.3.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30–3 नुसार गठीत वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची सभा सोमवार दिनांक 6.7.2017 रोजी दूपारी 2.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात संपन्न झाली त्या सभेचे इतिवृत्त.

सभेत मा. सभापती श्री मनोज केशवराव चाफले, मा. उपसभापती प्रमोद ताराचंद कौरती मा. सदस्य श्री लखन सुमेरा ऐरावार, मा. सदस्य श्री विजय चुटेले, मा. सदस्या श्रीमती भावना लोणारे, मा. सदस्या श्रीमती आशा उईके, मा. सदस्या श्रीमती वंदना चांदेकर मा. सदस्या विशाखा बान्ते, मा.मुख्य अभियंता, मा. अति. उप निगम आयुक्त श्री दांडेगावकर मा. आरोग्याधिकारी व्दय उद्यान अधिक्षक, अभियंता वर्कशॉप, तथा आरोग्य विभागाचे झोनल अधिकारी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

सभेती विषयपत्रिकेतील विषय कमांक 1 नुसार मागील सभेच्या अहवालाला मंजूरी प्रदान करने. यारा सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

विषय कमांक 2 नुसार स्मशान घाटात वृक्ष लागवड व सौदर्यीकरण संदर्भात चर्चा करण्यात आली उद्यान विभागाने स्मशान घाटाचे काम हे झोन मार्फत करण्यात येते तेथे वृक्ष लागवड गार्डन ही कामें उद्यान विभागा मार्फत करण्यात येते या संबंधात कोणत्याही सुचना दिल्यास ते काम करण्यात येईल अशी माहिती देण्यात आली.

यावेळी मा. सदस्य लोणारे यांनी नारी घाट येथे सिक्युरीटी गार्ड, गोव–या नसल्याबद्दल तसेच सुरक्षा भिंत बांधून देण्याबाबत मागणी केली. शेडेनगर फुलनगर येथील दवाखान्यात व्यवस्था पुरेशी नाही, फर्नीचर व अन्य बाबींची नितांत आवश्यकता आहे. यापुर्वी निश्चित केल्याप्रमाणे डॉक्टरांचे विवरणाचे फलक लागलेले नाही. शेडेनगर, कामगारनगर, येथे 15–15 दिवस कचरा उचलला जात नाही नागरिक रस्त्यावर कचरा टाकतात कचरा वेगळा वेगळा करण्यात येत नसुन एकत्र करुन उचलला जात आहे.

मा. सदस्या श्रीमती बांते यांनी वैशाली नगर घाटावर विसावा खचलेला आहे गोव–या नाही अनेक व्यवस्था विस्कळीत झाल्या आहे त्या पुरविण्याची मागणी केली असता सभापती यांनी संबंधीत सर्व विषयावर अधिका–यांस स्थळी देण्याचे निर्देशित केले.

मा. सदस्य श्री विजय चुटेले यांनी मोक्षधाम घाटावर यापुर्वी केलेल्या सुचनांचे पालन केले नसल्याचे निदर्शनात आणुन दिले. मोक्षधाम येथे कार्यालयाची स्थिती खराब आहे, बाथरुम की स्थिती खराब आहे. मुख्य दरवाजा दुरुस्ती करने आवश्यक आहे, व्हॉल कम्पोंड

पडण्याच्या अवस्थेत आहे ती नाल्यात पडू शकते इत्यादी बाबीवर काम करण्याच्या सुचना केल्यावर सभापती यांनी सर्व घाटावर व्यवस्थेचे निरिक्षणार्थ सदस्यांसह दौरा करण्याचे नियोजन करण्याचे निर्देशित केले.

यावेळी नाले सफाईच्या संदर्भात चर्चा करण्यात आली. लोकांच्या घरात पाणी शिरत आहे त्यावर प्रतिबंधात्मक उपायाचा अवलंब करण्याचे निर्देशित करण्यात आले. या करीता एमरजंसीसाठी असलेल्या व्यवस्थेचा लाभ घेण्याचे निर्देशित करण्यात आले.

विषय क्रमांक 3 नुसार संसर्गजन्य डेंग्यु व किटकजन्य रोगावर उपाययोजना करणेबाबत चर्चा या विषयावर चर्चा करण्यात आली. यावर विभागातर्फे विभागाच्या कामकाजा संबंधात अहवालाचे वाचन करण्यात आले. यात सांगण्यात आले की 9 डेंगु चे रोगी 4 मलेरियाचे आणी 4 फायलेरीयाचे पॉजेटीव्ह आढळले. यावर घराघरात निर्माण होणारा लारवा नष्ट करण्यात प्राधान्य देण्यात येत असल्याची माहीती दिली. फॉगींग मशीन संबधात चर्चा करण्यात आली त्याचे योग्य व्यवस्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले सभापती यांनी फॉगींग करतांना संबंधीत मा. सदस्यांना विश्वासात घेण्यावेही निर्देश दिले.

सभापती यांनी माहिती दिली की ते आयसोलेशन हॉस्पीटलचा दौरा करीत होते तेव्हा ईमारतीला रंगरंगोटीचे काम चालु होते संबंधीत कर्मचा–याला त्या संबंधी कोणतीही माहिती नव्हती हे काम 25-26 लाखाचे आहे कामाचा दर्जा हा निकृष्ठ दिसुन आला याचे नियत्रंण योग्य प्रकारे होतांना दिसले नाही म्हणुन यावर आरोग्य विभागाचे पुर्ण नियंत्रण असावे असे त्यांना वाटले आरोग्य विभागा संबंधीत जे काम आहे हे आरोग्य विभागाच्या मार्फत करणे उचित होईल आरोग्य विभागाच्या शिफारसी शिवाय संबंधीत कामाचे भुगतान करण्यात येवू नये असे यावेळी निर्देशित करण्यात आले. आयसोलेश दवाखान्यात पुष्कळ मोठ कबाड पडलेले आहे त्यांची योग्य विल्हेवाट लावण्यात यावी त्यामुळे मिळणा-या निधीचा योग्य उपयोग करता येवू शकते. आयसोलेशन हॉस्पीटल येथील कर्मचारी वसाहतीत राहणा–या संबंधात योग्य निर्णय घेवून कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात आले.

मा. सदस्यांनी त्यांच्या प्रभागातील बाबुलखेडा,रामेश्वरी येथील दवाखान्याकरीता हॉल ,2 स्वच्छालय, बांधून देण्याबाबत मागणी केली यावर प्रस्ताव देण्यात आल्याचे विभागाव्दारे माहिती देण्यात आली. दवाखान्यात कर्मचा--यांची संख्या कमी आहे सध्या असलेले डॉक्टर हजर राहत नसल्याची तक्रार करण्यात आली. यावर व्यवस्था करण्यात येत असल्याबद्दल विभागाने माहिती दिली. विभागातर्फे देवडीया व मिनीमातानगर दवाखाने हे एन.यु.एच.एम. व्दारे निर्मीतीचे प्रस्ताव असल्याची माहिती देण्यात आली. विभागाच्या आवश्यकता पाहता काही खाजगी दवाखान्याची मदत घेण्यात येत असल्याचीही माहिती देण्यात आली.

मा. सदस्य उईके यांनी मोमीनपुरा कब्रस्थान येथे समस्या असल्याबद्दल तसेच तेथील दवाखान्यात डॉक्टर व अन्य समस्या सफाई कर्मचारी संबंधात असल्याचे सांगीतले मोमीनपुरा बकरामंडी येथे सकाळी 6 पासुन रात्री पर्यन्त कत्तल चालु असते प्राण्याचे अवयव आतड्या साठवून ठेवल्या जाते त्यांचा नागरिकांना खुप त्रास होतो त्या क्षेत्रात गिट्टीखदान व अन्य जागेवरुन ट्रक भरुन कचरा इथे टाकल्या जातो. रोगराई पसरण्याची दाडगी शक्यता असते म्हणुन यावर प्रतिबंधात्मक उपायाचा अवलंब करण्याकरीता विनंती केली स्थानीय नागरिकांनी यां करीता आंदोलने करतात. तेथे कनकचा एकच कर्मचारी आहे, तेथे अधिक गार्डचीही आवश्यकता आहे अशी सुचना केली यावर सभापती यांनी आरोग्यधिकारी यांना स्थळी भेट देवून या समस्येचा अभ्यास करुन योग्य उपाय प्रस्तावित करावे असे निर्देशित केले. त्यांच्या क्षेत्रात दुषीत पाण्याची खुप समस्या आहे त्याचे निराकरण करण्यात यावे तसेच आवश्यक पाणी शुध्द करण्याच्या औषधी ज्या विभागाव्दारे पुरविण्यात येतात त्या डोबी,बकरामंडी, बोरीयापुरा अश्या ठिकाणी पुरविण्यात यावा. उघड्यावर विकणारे खाद्य पदार्थ हे सुरक्षीततेच्या आवश्यक बाबीची पुर्तता केल्यावर विकण्यात येवू नये असे प्रतिबंध नियमानुसार करण्यात यावे. या करीता त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यात यावे अशी मागणी केली. मा. सभापती यांनी स्वस्त दरात विकणा--या खाद्यपदार्थांचेही अवलोकन,निरीक्षण नियमानुसार व्हावे असे निर्देशित करण्यात आले.

धंतोली झोनची गाडी बिघडलेली असल्यामुळे योग्य व्यवस्था करण्याचे सभापतीव्दारे निर्देशित करण्यात आले.

मा. सदस्य श्री येरावार यांनी मशीनरी रिपेअरींग करीता खुप वेळ लागतो त्यामुळे कामे खोळंबतात त्यावर योग्य उपाय योजना करण्यात यावी तसेच आरोग्य विभागाकरीता घेत असलेल्या मशीनरी त्यांचा वार्ड फंड अतिशय सिमीत असल्यामुळे किरकोळ कामें त्यातुन शक्य होत नसल्यामुळे ह्या त्यांच्या वार्ड निधीतुन न घेता अन्य निधीतुन घेण्यात यावी अशी विनंती केली त्यावर सभापती यांनी ह्या करीता योग्य प्रस्ताव देण्याचे निर्देशित केले.

सर्वात जास्त मशीनरी ही आरोग्य विभागाच्या असुन वर्कशॉपमध्ये जास्त काम आरोग्य विभागाचेच राहते, योग्य नियोजना करीता वर्क शॉपवर पूर्ण नियंत्रण पुर्वीप्रमाणे आरोग्य विभागाचे असणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रशासनाने पुन्हा आरोग्य विभागाकडे वर्कशॉप देण्यासंबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. झोनल अधिकारी यांना खुप फिरावे लागते करीता त्यांना वाहनाची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. असे सभापती यांनी निदेर्शित केले. सामुहीक गाळेच्या संदर्भात कचरा जमा करण्याबाबत योग्य पध्दत अमलात आणने आवश्यक आहे याबाबत अभ्यास करुन योग्य प्रस्ताव देण्यात यावा असे निर्देशित करण्यात आले.

आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले की सफाई कर्मचारी ,ऐवजदार यांना सर्व ठिकाणी कोणत्याही कामाकरीता वेळोवेळी लावण्यात येते त्यामुळे सफाई कडे दुर्लक्ष होते या संदर्भात विभागाने ह्या बाबीवर योग्य विचार करुन नियोजन करुन प्रस्ताव द्यावा असे सभापती यांनी निर्देशित केले.

सिव्हरेज सिस्टीम स्ट्राम ड्रेन सिस्टीम ही तांत्रिक व्यवस्था आहे अन्य महानगरपालिकेत या करीता वेगळे विभाग आहे म्हणुन ही बाब तांत्रिक विभागाकडे सोपविणे सोईचे होईल कारण स्वास्थ विभागाचा कर्मचारी हा तांत्रिक नसतो त्यामुळे योग्य नियोजन त्यांचे व्दारे होणे शक्य नाही यास्तव प्रशासनाने याबाबत अभ्यास करुन योग्य प्रस्ताव त्वरीत द्यावा असे निर्देशित करण्यात आले.

मा. सदस्य यांनी रामनगर येथील कम्युनीटी हॉलचे पीण्याच्या पाण्याची टाकी अशुध्द असल्यामुळे नागरिकाना दुषीत पाणी पुरविले जाते त्याचे निरीक्षण करुन योग्य कार्यवाही करण्यात यावी असे सभापती यांनी निर्देशित केले.

सफाई कर्मचारी यांना गणवेश, ओळखपत्र, सुरक्षाची संसाधने देण्यात यावी दिलेल्या कर्मचा-यांनी घातली नाही तर त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी. त्यांच्या व त्यांच्या कुटूंबियाकरीता आरोग्य कार्ड सारखी सुविधा उपलब्ध करण्याबाबतची संभावना तपासण्यात यावी त्याचे वेळोवेळी शारीरीक तपासणी कॅम्प लावून करण्यात यावी अशी सुचना मा. सदस्य श्री विजय चुटेले यांनी केली. सफाईची कोणती कामे करण्यात येत आहे याची माहिती संबंधीत नगरसेवकाना वेळोवेळी देण्यात यावी असे सभापती यांनी निर्देशित केले.

यानंतर मा. सभापती यांनी सभेचे समापन केले.

(स्वाक्षरी)
निगम सचिव
नागपूर म.न.पा.नागपूर

(स्वाक्षरी)
सभापती
वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची

**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची मंगळवार दिनांक 08.08.2017 रोजी दुपारी 2.00 वाजता मा.सभापती वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती यांच्या कक्षात भरलेल्या आढावा सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्री.मनोज चापले यांचे सह मा.सदस्य श्री. लखन येरवार, मा.सदस्य श्री.विजय चुटेले, मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे, मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके, मा.सदस्या श्रीमती वंदना चांदेकर आणि विभागाकडून अति.उपायुक्त श्री.दांडेगावकर, आरोग्य अधिकारी(स्वच्छता) डॉ.दासरवार, आरोग्य अधिकारी डॉ.चिव्हाणे, मलेरिया फायलेरिया अधिकारी, सर्व झोनचे झोनल अधिकारी उपस्थित होते.

विषय क्र. 1:– दि.06.07.2017 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवाहीला मंजुरी प्रदान करण्यात आली त्यानंतर झोनल अधिका–यांना देण्यात येणा–या वाहनाच्या संदर्भाने चर्चा करण्यात आली. प्रशासनाचे काम चांगल्याप्रकारे चालावे या दृष्टीकोनातून झोनल अधिका–यांना वाहने देण्यात यावी या बाबीच्या अनुषंगाने सविस्तर माहिती देणारा प्रस्ताव मा.आयुक्तांना सादर करण्यात यावा असे मा. सभापती यांनी निर्देशित केले.

विषय क्र.2:– गणपती विसर्जना निमित्त करण्यात येणा–या कार्यवाहीबाबत चर्चा करण्यात आली असता अति.उपायुक्त यांच्यामार्फत माहिती देण्यात आली की मागच्या वर्षी 155 कृत्रिम टॅंक लावण्यात आले होते. या टॅंकद्वारे 50 टक्के घरगुती गणपतीचे विसर्जन करण्यात आले. या वर्षी प्रत्येक झोनमध्ये किती टॅंकची आवश्यकता आहे. आणखी किती वाढविता येईल त्याचे लोकेशन झोन स्तरावरून मागविलेले आहे. तसेच जनजागृती करण्याच्या अनुषंगाने मा. महापौरजी, आयुक्त महोदय आणि समिती सभापती मार्फत लोकांना जाहीर आव्हान करण्यात येईल. मोठया गणेश मंडळांना धातूची मुर्ती ठेवून विसर्जनाकरिता लहान मुर्ती ठेवल्यास अनुदान देण्याविषयी सुध्दा आव्हान करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

या अनुषंगाने मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, ही सगळी प्रक्रिया दोन–तीन महिन्याआधी करणे अपेक्षित होते. येणा–या काळात ही सगळी प्रक्रिया दोन–तीन महिन्याआधी होईल अशी व्यवस्था करण्यात यावी.

सभेत मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके यांनी सुचविले कि गांधीसागर तलावाच्या चारही बाजूला चार टॅंक लावण्यात यावे तसेच पोलीस स्टेशनमध्ये ज्यावेळी मंडळाकडून परवानगीसाठी अर्ज सादर करण्यात येतो तेव्हा कशा पध्दतीने विसर्जन करण्यात येईल या विषयी मंडळाकडून माहिती घेण्यात यावी. आरोग्य अधिकारी यांनी माहिती देतांना सांगितले की गांधीसागर तलावाच्या तीन बाजूला तीन टॅंक लावण्यात येणार असून संपुर्ण तलाव सील करण्यात येणार आहे.

या अनुषंगाने आरोग्य अधिकारी यांनी दौरा करावा असे मा.सभापती यांनी सुचित केले. तसेच गणपती विसर्जनाच्या संदर्भात एक मोठा तलाव तयार करणे, पाचगाव खदानीच्या खड्डयात गणपती विसर्जन करणे अशा प्रकारची व्यवस्था भविष्यात करण्याच्या दृष्टीकोनातून आराखडा तयार करण्यात यावा असे त्यांनी निर्देशित केले.

विषय क्र.3:- संसर्गजन्य, डेंग्यु व किटकजन्य रोगावर उपाययोजना करणेबाबत चर्चेदरम्यान डॉ. चिव्हाणे यांनी माहिती दिली की महानगरपालिकेच्या सदर आणि महाल रूग्णालयात स्वस्त आणि चांगल्या पध्दतीने तपासणी करण्यात येते. याबाबत लोकांमध्ये जनजागृती सुध्दा करण्यात येत आहे.

मा.सदस्य श्री.लखन येरवार यांनी प्रभागात कोणत्याही प्रकारची जनजागृती झाली नसल्याबद्दल सांगितले.

मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके यांनी प्रभागात विशेषतः स्लम भागात कॅम्प लावून नागरिकांचे रक्ताचे नमुने घेण्यात यावे असे सुचविले. तसेच जीवनड्राप आणि औषधे देण्याविषयी सांगितले.

या अनुषंगाने मा.सभापती यांनी निर्देशित केले की संसर्गजन्य, डेंग्यु व किटकजन्य रोगावर उपाययोजनेच्या अनुषंगाने या कालावधीमध्ये लोकांनी काय काळजी घेतली पाहिजे याची माहिती देणारे होर्डिंग लावून जनजागृती करण्यात यावी.

विषय क्र. 4:- हिवताप व हत्तीरोग विभागाच्या कामकाजांबाबत चर्चा दरम्यान मलेरिया व फायलेरिया अधिकारी श्रीमती थोटे यांनी माहिती देतांना सांगितले कि रात्रकालीन सर्वेक्षण, रूग्णांचा शोध, रक्ताचे नमुने घेणे आणि औषधोपचार करणे हे दैनंदिन कार्यक्रम सुरू आहेत. डेंगू मच्छरांचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून सर्वोतोपरी उपाययोजना करण्यात येत आहे असे सांगितले.

मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे यांनी आशीनगर झोन अंतर्गत या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे सांगितले. प्रभागात फॉगींग मशीन सुध्दा फिरविण्यात आली नसल्याबद्दल तसेच खाली प्लॉटवर पानी साचून मच्छरांची पैदास मोठया प्रमाणात होत आहे असेही त्यांनी सांगितले. मलेरिया आणि फायलेरिया अधिकारी यांनी सांगितले की झोनवाईज दोन फॉगिंग मशीनद्वारे प्रोग्राम घेण्यात येत आहे. तीन फॉगिंग मशीनची निविदा प्रकिया केली असून पुढच्या पंधरा दिवसात मशीन येतील त्यानुसार फॉगींगचा कार्यक्रम राबविण्यात येईल.

मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके यांनी शासकीय हॉस्पीटल असलेले मेयो हॉस्पीटल

येथील गार्ड आणि डॉक्टरांची वर्तवणुक मा.नगरसेवकांशी बरोबर राहत नाही या बाबत हॉस्पीटलच्या डीनसोबत बैठक लावण्यात यावी अशी सुचना केली.

शेवटी मा.सभापती यांनी निर्देशित केले की हिवताप व हत्तीरोगावर उपाययोजनेच्या अनुषंगाने ज्या विषयाची जेव्हा आवश्यकता आहे त्यानुसार त्याची आधीच व्यवस्था करण्यात यावी. याविषयी लोकांमध्ये जनजागृती करण्यात यावी. डेंगुच्या संदर्भाने, ज्या घरी किंवा स्थळी लारव्हा अळी आढळून आली असल्यास त्यांना स्वच्छतेविषयी नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात यावी. वेंकटेश अपार्टमेंट येथील पाण्याच्या टाकीची सफाई न झाल्यामुळे अशुध्द पाण्याचा पुरवठा होतो त्या अनुषंगाने नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात यावी. दवाखान्यावरील देखरेख आणि नियंत्रणच्या संदर्भात बैठक लावण्यात यावी तसेच शासकीय हॉस्पीटलच्या संदर्भात एक कोअर समिती बनविण्यात यावी. सेग्रीगेशनच्या संदर्भाने, प्रभागवाईज किती गाडयांची आवश्यकता आहे त्यानुसार गाडयांची व्यवस्था करण्यात यावी. अस्वच्छता करणा–या सगळया हॉटेल, दुकानदारांना या अनुषंगाने नोटीस देण्यात यावी. पुढच्या बैठकीत याबाबत माहिती देण्यासाठी प्रभागवाईज सुपरवायजर यांना बैठकीला पाठविण्यात यावे असे सुचित करून सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती**

G:\vaidkiya seva va arogya vishesh samitee\08-8-2017.docx

**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची बुधवार दिनांक 13.09.2017 रोजी दुपारी 2.00 वाजता मा.सभापती वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती यांच्या कक्षात भरलेल्या आढावा सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्री.मनोज चापले यांचे सह उप सभापती श्री.प्रमोद कौरती, मा.सदस्य श्री. लखन येरवार, मा.सदस्य श्री.विजय चुटेले, मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे, मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके, मा.सदस्या श्रीमती वंदना चांदेकर आणि विभागाकडून अति.उपायुक्त श्री. दांडेगावकर, आरोग्य अधिकारी(स्वच्छता) डॉ.दासरवार, आरोग्य अधिकारी डॉ.चिव्हाणे, मलेरिया फायलेरिया अधिकारी, सर्व झोनचे झोनल अधिकारी उपस्थित होते.

विषय क्र. 1:— दि.08.08.2017 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवाहीला मंजुरी प्रदान करण्यात आली त्यानंतर मा.सभापती यांनी वर्कशॉप महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या अखत्यारित यावे या अनुषंगाने पत्र दिलेले असून त्यावर काय कार्यवाही करण्यात आली याची विचारणा केली असता आरोग्य अधिकारी श्री.दासरवार यांनी सांगितले की वर्कशॉप विभाग आधी आरोग्य विभागाच्या अखत्यारितच होते परंतु मधल्या काळात काही आक्षेप आल्यामुळे ते काढण्यात आले. कोणत्या कारणामुळे काढण्यात आले ती नस्ती गहाळ झालेली आहे त्याचा शोध घेणे सुरू आहे. तद्नंतर अति.उपायुक्त श्री.दांडेगावकर यांनी सांगितले की आरोग्य विभागाची भरपूर कामे वर्कशॉप विभागाशी निगडीत आहेत. नस्तीचा शोध लागेपर्यंत कामात कुठल्याही प्रकारची अडचण येवू नये म्हणून जोपर्यंत हा विभाग आरोग्य विभागाच्या अखत्यारित येत नाही तोपर्यंत त्या विभागाच्या प्रमुखाला बैठकीत बोलावून त्यांच्याकडून काम करून घेता येईल असेही ते म्हणालेत.

विषय क्र.2:— नागपूर महानगरपालिकेच्या अंतर्गत येणा—या दहनघाटावर देखरेख, नियंत्रण सौदर्यीकरणाबाबत चर्चा केली असता आरोग्य अधिकारी डॉ. दासरवार यांनी सांगितले की महानगरपालिकेच्या 14 घाटावर आरोग्य विभागाचे नियंत्रण असते. घाटावर लाकडे पुरविणे, सर्टिफिकेट देणे, साफसफाईचे काम हे आरोग्य विभागामार्फत केले जाते. घाटाचे बांधकाम आणि सौदर्यीकरणाचे काम झोन स्तरावरून केले जाते. याबाबत झोनल अधिका—यांना निर्देश देण्यात आलेले आहे.

मा. सभापती यांनी सुचित केले की घाटाचे निरीक्षण करण्यात यावे असे समितीद्वारे निर्देशित केल्यानंतर सुध्दा घाटाचे निरीक्षण करण्यात आले नाही. वैशालीनगर घाट आणि गंगाबाई घाटाची दुरावस्था झालेली आहे. पुढच्या सभेत कोणत्या घाटावर काय व्यवस्था करावयाची आहे, कोणते बांधकाम करावयाचे आहे, सौदर्यीकरण कुठे करावयाचे आहे याबाबतचा संपुर्ण अहवाल ठेवण्यात यावा. या संपुर्ण बाबींवर समितीचे नियंत्रण असले पाहिजे अशी समितीची शिफारस आहे.

मा.सदस्य श्री. विजय चुटेले यांनी त्यांच्या परिसरातील घाटावर डयुटीवर असलेल्या कर्मचा–यांच्या जागेवर त्या परिसरातील काही गुंड लोक येवून त्यांच्या खुर्चीवर बसतात आणि अवैध प्रकार केले जातात. ते लाकडांसाठी लोकांकडून जबरदस्तीने पैसे वसुल करतात. घाटावर साफसफाई केली जात नाही असे सांगितले.

विषय क्र. 3:– संसर्गजन्य, डेंग्यु व किटकजन्य रोगावर उपाययोजना करणेबाबत चर्चा केली असता डॉ. चिव्हाणे यांचेमार्फत सांगण्यात आले की शहरात स्वाईनफ्युचे 152 पाझिटीव्ह केसेस दिसल्या या गणपती उत्सवाच्या कारणाने दृष्टीपत्तीस आल्या आहेत. याचा मोठा बाऊ करणे संयुक्तीक होणार नाही कारण पहिल्या स्किनिंग टेस्ट मध्ये दिसत असल्या तरी दुस–या टेस्टमध्ये त्या पॉझिटीव्ह येतातच असे नाही. या अनुषंगाने त्यांनी सविस्तर प्राथमिक काळजी म्हणून काय करावयास हवे याची माहिती दिली. शहरातील खाजगी आणि सरकारी अशा एकुण 42 हॉस्पीटल मधून औषधी आणि सगळी सोय करण्यात येत आहे. स्वाईनफ्यु वर मात करण्यासाठी हाताची स्वच्छता कशी ठेवायची आणि काय काय काळजी घेतली पाहिजे याचे प्रात्याक्षिकाद्वारे शाळा, महाविद्यालयातून जनजागृती करण्यात येत आहे अशीही त्यांनी माहिती दिली.

मलेरिया व फायलेरिया अधिकारी श्रीमती थोटे यांनी माहिती देतांना सांगितले होर्डिंग, पत्रके यांचा वापर करून डेंग्यु विषयी जनजागृती करण्यात येते आहे. 845 घरांची तपासणी केली असता 731 घरात लारव्ही आढळल्या आहेत. टेरेसवर पाणी साचलले असून त्यात लारव्ही आढळलेल्या आहेत. फॉगिंगचा सर्व झोनमधील पहिला राऊंड झालेला आहे.

मा.उप सभापती श्री.प्रमोद कौरती यांनी कर्नाटक हॉल आणि बावणे कुणबी समाज हॉल मधील पाणीच्या टाक्यामध्ये डेंग्युचे मच्छर आढळलेले आहे त्या हॉलला 7 दिवसांत खाली करून देण्याची नोटीस तसेच दंड लावण्याची कार्यवाही करण्यात यावी असे सांगितले.

मा.सदस्य श्री. चुटेले यांनी सांगितले कि, प्रभागात फॉगिंग केली जाते परंतु त्यांची माहिती नगरसेवकांना दिली जात नाही. परिसरात फुटपाथमधील चेंबर तुटलेले आहे ते दुरूस्त करण्यात यावे. तसेच कॉटन मार्केट चौकात पाणी जमा होते याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे यांनी फॉगिंगकरिता मशीन पाठविली जाणार होती परंतु पाठविण्यात आली नाही असे सांगितले.

मा.सदस्य श्री. येरवार यांनी सफाई कर्मचा–यांना दोन–तीन वर्षापासून गणवेश मिळाले नसल्याबाबत विभागाला विचारणा केली असता डॉ. दासरवार यांनी फाईल मुव्ह केल्याचे सांगितले. तसेच हॉटेलवाले चेंबरमध्ये घाणेरडे पाणी टाकतात त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी या भागाची पाहणी करण्यात यावी.

मा.सदस्या श्रीमती आयशा उईके यांनी सफाई कर्मचा–यांना ओळखपत्र आणि गणवेश देण्याविषयी सुचविले. तसेच फॉगिंग मशीन आठवडयातून एक तास परिसरात फिरविली जावी. उंच असणा–या इमारतीमुळे आतमधील वस्तीत फॉगिंग मशीन फिरू शकत नाही करिता हॅन्ड फॉगिंग मशीनद्वारे फॉगिंग करण्यात यावी. के.पी.ग्राऊंड जवळील बँक ऑफ बडोदा येथे चेंबर कोलॅप्स झाल्यामुळे तेथे घाणेरडा वास येतो तो दुरूस्त करण्यात यावा अशी त्यांनी मागणी केली. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली परंतु बकरी मंडी परिसरातील जे हॉटेल रात्री उशिरापर्यंत सुरू राहतात आणि हॉटेलमधील सगळे वेस्ट मटेरियल जामा मस्जीद समोर टाकतात त्यामुळे लोक त्रस्त झाले आहेत. या सगळया हॉटेलला नोटीस देण्यात यावी की आपआपले वेस्ट मटेरियल टाकण्यासाठी टब लावण्यात यावा. जे करणार नाही त्यांच्याकडून दंड आकारण्यात यावा.

अति.उपायुक्त श्री.दांडेगावकर यांनी सांगितले की, अस्वच्छता करणा–या, कचरा फेकणा–या विरूध्द स्कॉड तयार केले जाणार आहेत. त्याविरूध्द कार्यवाहीचे दर मंजूर झालेले आहे. भरती व्हायची आहे ती झाल्यास कार्यवाही सुध्दा करण्यात येईल. अस्वच्छता करणारे, डेंग्यु चा लारव्ही आढळणा–या विरूध्द दंड लावता येईल असा प्रस्ताव समितीकडून आल्यास त्याला मंजूरी देता येईल.

मा.सभापती यांनी निर्देशित केले कि, ज्या कंपनीला, एजन्सीला होर्डिंग लावण्याची परवानगी देतांना अटीशर्ती लावण्यात याव्यात की त्यांनी एका महिन्याच्या अवधीत 7 दिवस डेंग्यु रोगाच्या जनजागृतीकरिताचे होर्डिंग लावावेत. समितीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने ड्रेनेज, चेंबरचे काम करण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यात यावा.

विषय क. 4:– मनपाच्या दवाखान्याच्या देखरेख, नियंत्रण इत्यादीबाबत चर्चा केली असता डॉ. चिव्हाणे यांनी माहिती देतांना सांगितले की मा.महापौरजी यांनी घेतलेल्या बैठकीत निर्देशित केल्याप्रमाणे 5 दवाखाने सर्व सोयीने सुसज्ज करावयाचे आहे. त्यानुसार प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या प्रस्तावानुसार आरोग्य समितीच्या देखरेखीवर हे काम आरोग्य विभागाने करावयाचे आहे. याबाबत मेडिकल ऑफीसरला जबाबदार धरण्यात येईल. एनयुएमएमच्या धर्तीवर दिलेल्या निकषाप्रमाणे दवाखाने तयार करण्यात आले की नाही याची पाहणी करण्यात यावी असेही ते म्हणालेत. या अनुषंगाने मा.सभापती यांनी विभागाला हा प्रस्ताव पाठविण्यात यावा आणि काम सुरू करण्यात यावे, यावर समितीचे नियंत्रण असले पाहिजे असे निर्देशित केले.

मा.सदस्या श्रीमती आशा उईके यांनी प्रभागात कुत्र्यांची संख्या वाढलेली असून कुत्रा चावल्याचे प्रकार वाढलेले आहे असे सांगितले.

मा.सदस्या श्रीमती वंदना चांदेकर यांनी प्रभागात पाच–सहा दिवस कचरा उचलला जात नाही, कचरा उचलायला गाडी पाठविली जात नाही असे सांगितले.

मा सदस्य श्री. चुटेले यांनी सांगितले कि, कचरा उचलणा–या ओसीडब्लूच्या कर्मचा–यांना एरिया माहीत नाही त्यांना एरिया सांगण्यात यावा तसेच कचरा उचलल्या नंतर नगरसेवकांची डायरीत नोंद घेण्यात यावी. आयसोलेशन हॉस्पीटलमध्ये ठेवण्यात आलेल्या ड्रममध्ये मच्छर झालेले आहे असेही त्यांनी सांगितले.

अति.उपायुक्त श्री.दांडेगावकर यांनी केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत योजनेच्या अनुषंगाने 15 सप्टेंबर ते 2 ऑक्टोंबर या 5 दिवसीय दरम्यान ओला–सुखा कच–याचे विलगीकरण, कच–या कुंडयाचे वाटप, उडड्‌ानपुल, ऐतिहासिक स्थळे, शालेय सत्रात शपथ घेणे, जनजागृती, नवीन शौचालयाचे उद्‌घाटन याकार्यक्रमांअंतर्गत असलेल्या शासनाच्या परिपत्रकाचे वाचन केले. तद्‌नंतर या शासनाच्या परिपत्रकाला समितीमध्ये मान्यता प्रदान करण्यात आली.

सरतेशेवटी गणपती उत्सवाच्या निमित्ताने स्वच्छतेच्या अनुषंगाने आरोग्य विभाग, सफाई कर्मचारी व संपुर्ण चमुने चांगले काम केल्याबद्‌दल मा. सभापती यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि आशीनगर झोन क. 9 येथे स्थायी व अस्थायी सफाई कर्मचा–यांची यादी आणि कच–याची उचल करणा–या गाडया किती? सुपरवायजरचे नाव या अनुषंगाने लेखी माहिती मा.सदस्यांना देण्यात यावी असे मा.सभापती यांनी सुचित करून सभा समाप्तीची घोषणा केली.

६।१८

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती**

**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची गुरुवार दिनांक 12.10.2017 रोजी दुपारी 2.00 वाजता मा.सभापती वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती यांच्या कक्षात भरलेल्या आढावा सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्री.मनोज चापले, मा.सदस्य श्री. लखन येरवार, मा.सदस्य श्री.विजय चुटेले, मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे, मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके, मा.सदस्या श्रीमती वंदना चांदेकर, मा.सदस्या श्रीमती विशाखा बांते आणि विभागाकडून अति.उपायुक्त श्री. दांडेगावकर, आरोग्य अधिकारी(स्वच्छता) डॉ.दासरवार, आरोग्य अधिकारी डॉ.चिव्हाणे, मलेरिया फायलेरिया अधिकारी, सर्व झोनचे झोनल अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली.

विषय क. 1:– दि.13.09.2017 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवाहीला मंजुरी प्रदान करण्यात आली.

2. ताजबाग येथे होणा–या ऊर्समध्ये विभागातर्फे करण्यात येणा–या व्यवस्थेबाबत सभेत चर्चा केली असता डॉ. दासरवार यांनी माहिती देतांना सांगितले कि दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा ताजबाग येथे 3 शिफ्टमध्ये 50 सफाई कर्मचारी लावण्यात आले आहेत. तसेच 4 मोबाईल टॉयलेट लावण्यात आले असून कचरा जमा करण्याकरिता कनकमार्फत 24 तास गाडया लावण्यात आल्या आहेत. अस्थायी टॉयलेट स्वच्छ करण्याकरिता एजन्सी नियुक्त केलेली असून एजन्सीमार्फत 24 तास टॉयलेटची साफ सफाई करण्यात येईल. फॉगिंग मशीनद्वारे औषधी फवारणीची सुध्दा व्यवस्था करण्यात येत आहे. झोन क. 5 नेहरूनगर तर्फे साफ सफाईच्या संदर्भातील सर्व व्यवस्था करण्यात येत आहे. कचरा एका ठिकाणी जमा करून कच–याची उचल केली जात आहे. छोटा ताजबाग येथे सुध्दा यावर्षी 1 मोबाईल टॉयलेट देण्यात आले आहे.

ताजबाग येथे होणा–या ऊर्समध्ये भाविकांना आरोग्य सेवा पुरविण्याच्या अनुषंगाने डॉ. चिव्हाणे यांनी माहिती देतांना सांगितले कि, ताजबाग ट्रस्टच्या बाजूला मनपाचा एक रेग्युलर दवाखाना आहेच त्या व्यतिरिक्त 24 तास 3 शिफ्टमध्ये 18 डॉक्टरांची एक चमू तेथे दिलेली आहे. तसेच मुख्य रस्त्याच्या बाजूला एक सुसज्ज एम्बुलंन्सची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच 108 नंबरच्या 2 गाडया लावलेल्या आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बॅनर, पोस्टराच्या माध्यमातून माहिती देवून स्वाईन फ्लू, मलेरिया, डेंग्यू या रोगाच्या संदर्भाने औषधी देण्याकरिता स्टॉल ठेवलेले आहे. याबाबत आजच सविस्तर आढावा बैठक बोलाविण्यात आली असून त्यात सर्व डॉक्टरांना निर्देश देण्यात आले आहेत. ताजबाग येथे होणा–या ऊर्समध्ये मोठया प्रमाणात येणारा भाविकवर्ग लक्षात घेता स्वाईन फ्लु, डेंगू रोगाच्या संदर्भातील पुर्ण सतर्कता घेण्यात येईल. मॉस्क लावण्याबाबत जनजागृती म्हणून पुर्ण मेडिकल टीम मॉस्क घालून वावरणार

असेही त्यांनी सांगितले असता आयजी मटेरियल वापरतांना लोकांमध्ये गैरसमज पसरू नये या पध्दतीने वापरण्यात यावे अशी अति.उपायुक्त श्री.दांडेगावकर यांनी सूचना केली.

तद्नंतर मा.सदस्या श्रीमती लोणारे यांनी सुचित केले की ताजबाग येथे आरोग्य विषयक सुविधा पुरविण्याकरिता म.न.पा. डॉक्टरांच्या चमू नेमलेल्या आहेत परंतु त्यामुळे म.न.पा. दवाखान्यातील आरोग्य सेवा विस्कळीत होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. या अनुषंगाने अति.उपायुक्त श्री.दांडेगावकर यांनी सांगितले की एका डॉक्टराची एका आठवडयात एक दिवस त्यांची डयुटी सांभाळून डयुटी लावण्यात येत असल्यामुळे म.न.पा.दवाखान्यातील आरोग्य सेवेवर त्याचा परिणाम होणार नाही.

मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके यांनी सुचित केले की ताजबाग येथे जे कुणी व्यक्ति, संस्था सेवा देण्यास तयार असतील तर त्यांना म.न.पा. आरोग्य विभागाकडून बॅच लावण्याकरिता देण्यात यावे. तसेच ताजबाग येथे होणा–या ऊर्समध्ये येणा–या भाविकांना आरोग्य विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या आरोग्य सेवा विषयक माहिती भाविकांना मिळेल याअनुषंगाने दिवसातून दोन–तीन वेळा याची उद्घोषणा करण्यात यावी.

मा.सभापती यांनी या अनुषंगाने निर्देशित केले की मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके यांनी सुचित केल्याप्रमाणे मदत करण्यास उत्सुक सामाजिक संस्थांना वर्तमानपत्राद्वारे आव्हान करण्यात यावे तसेच त्यांच्याशी संपर्क साधून त्याबाबतचा प्रस्ताव ताजबाग ट्रस्टकडे सुपुर्त करण्यात यावा.

3. संसर्गजन्य, डेंग्यु, स्वाईन फ्लू व किटकजन्य रोगावर उपाययोजना करणेबाबत चर्चा केली असता अधिका–यामार्फत माहिती देण्यात आली, स्वाईन फ्लूचे 302 रूग्ण आहेत त्यात जानेवारी ते ऑक्टोबर या दरम्यान दगावलेल्या रूग्णांची संख्या 35 आहे. डेंग्युचे मागच्या महिन्यात 43 पॉझिटीव्ह रूग्ण होते तर या महिन्यात 5 पॉझिटीव्ह रूग्ण आहेत. मलेरियाचा एकही पॉझिटीव्ह रूग्ण आढळलेला नाही तसेच चिकन गुनियाचा सुध्दा पेशंट आढळलेला नाही.

मा.सदस्या श्रीमती लोणारे यांनी माहिती देतांना सांगितले की स्वाईन फ्लूचा एक रूग्ण दगावला असून त्याची नोंद घेण्यास म.न.पा.च्या आरोग्य विभागाकडून कोणतीही यंत्रणा आली नाही. डॉ.चिव्हाणे यांनी सांगितले की या संदर्भात मा.महापौरजी आणि मा.आयुक्तांनी यांनी रूग्णांची नोंद घेण्याच्या संदर्भात खुपदा रूग्णालयांना आव्हान केलेले आहे. सरकारी, खाजगी रूग्णालयांकडून फार्म नंबर C भरून म.न.पा. कार्यालयास पाठवायचा आहे. परंतु तसे केले जात नसल्यामुळे म.न.पा.च्या आरोग्य विभागाला याची माहिती उपलब्ध होत नाही.

( त्यानंतर समितीत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचे वाचन डॉ.चिव्हाणे यांनी केले)

## प्रस्ताव

## प्रस्तावित बाहयरूग्ण व्यवसायिक धोरण

आरोग्य विभागामार्फत सद्यस्थितीत बाहयरूग्ण व्यवसाय(ओपीडी क्लिनिक) च्या नामांकनासाठी वापरण्यात येणारे पुर्व निकष कायम ठेवुन बाहयरूग्ण वैद्यकीय व्यवसायिक जागेबाबत धोरण निश्चितीचे आदेश प्राप्त असल्याने मनपा महासभा ठराव क्र. 102 अंतर्गत मा. सभापती, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती यांचेशी चर्चा करून प्राप्त निर्देशाप्रमाणे तयार करण्यात आलेला प्रस्ताव.

मुख्यतःरहिवाशी सदनिकेतील कुटुंबाना वैद्यकीय व्यवसायापासून त्रास होऊ नये तसेच वैद्यकीय व्यवसायिकांच्या बाहयरूग्ण व्यवसायाबाबत अधिकाराचे हनन होणार नाही या बाबी विचारात घेऊन खालीलप्रमाणे निकष प्रस्तावित आहे.

1) संपूर्ण रहिवाशी सदनिका (रेसीडेंशीयल फ्लॅट स्किम) मध्ये वैद्यकीय व्यवसायाचे नामांकन अनुज्ञेय नसावे.

(ठराव संमत झाल्यानंतर जर वैद्यकीय व्यवसायिक उल्लंघन करत असतील अशावेळी एमआरटीपी/डिसीआर 2000 अन्वये संबंधीत प्राधिकरणास संबंधित व्यवसाय धारकाचे विरूध्द कायदेशिर कार्यवाहीचे अधिकार असतील)

2) ओपीडी व्यवसायिक जागा वाणिज्यीक स्वरूपाची असावी.

I. व्यवसायिक जागेचे क्षेत्रफळ किमान 100 स्के.फिट असावे.

II. लोखंडी शटर असलेल्या व्यवसायिक जागेचा प्रवेश मुख्या मार्गावरून किंवा त्याच्या उपमार्गावरून थेट असावा. नामनिर्देशित नावाच्या फलकात शैक्षणिक अर्हता व दवाखान्याची वेळ स्पष्ट नमुद करणे अनिवार्य असावे.

3) रहिवाशी सदनिकेत संबंधीत जागेचा नकाशा वाणिज्यीक वापराकरीता मंजूरी धारण करीत असल्यास अशा जागेत ओपीडी व्यवसाय करण्यास किमान 70 टक्के गाळेधारकांची संमती घेणे बंधनकारक असावे.

4) धार्मीक अथवा सामाजिक समुदायाचे जागेत धर्मार्थ वैद्यकीय सेवेकरीता बाजूच्या रहिवाशांची संमती बंधनकारक नसावी.

5) बाहयरूग्ण व्यवसायिक संरचना विचारात घेऊन नामांकन शुल्क वसूलीबाबत प्रस्तावित धोरण.

| अ. क्र. | व्यवसायिक संरचना | पुर्व स्थापीत वार्षिक शुल्क | 1 एप्रिल 2018 पासून आकारण्यात येणारे प्रस्तावित वार्षिक शुल्क | आरोग्य समिती सभा दि. 12/10/17 च्या सुचनेप्रमाणे बदल/सुधारणा |
|---|---|---|---|---|
| 1 | जनरल बाहयरूग्ण व्यवसाय (ओपीडी क्लिनिक) | 500/– रू. | 1000/– रू. | 2000/– रू. |
| 2 | मल्टीस्पेशालिटी व्यवसाय बाहयरूग्ण(ओपीडी क्लिनिक | 500/– रू. | 3000/– रू. | 4000/– रू. |
| 3 | नेत्र चिकित्सा/दंत चिकित्सा व्यवसाय (ओपीडी क्लिनिक) | 500/– रू. | 2000/– रू. | 4000/– रू. |
| 4 | धर्मार्थ दवाखाना बाहयरूग्ण ओपीडी क्लिनिक | 500/– रू. | 1000/– रू. | अनुमोदीत |
| 5 | पॅथालॉजी लेबोरेटरी | 1000/– रू. | 3000/– रू. | 4000/– रू. |
| 6 | रक्तपेढी(ब्लड बॅक) | 1000/– रू. | 2000/– रू. | अनुमोदीत |

उपरोक्त प्रस्तावात समितीने शुल्कात सुचविलेल्या दुरूस्तीसह मंजूर करून म.न.पा. सभागृहात सादर करण्यास ही समिती एकमताने शिफारस करते.

या अनुषंगाने मा.सभापती यांनी निर्देशित केले की या प्रस्तावाची एक प्रत मा.सदस्यांना देण्यात यावी.

4. शहरातील साफ सफाई, नाला सफाई व कचरा पूर्णपणे उचलण्यात येतो किंवा कसे याबाबत चर्चा केली असता शहरातील नाला सफाई दरवर्षीप्रमाणे मॅन्युअली आणि मशीनद्वारे करण्यात येत आहे असे संबंधितामार्फत सांगण्यात आले.

डॉ. दासरवार यांनी माहिती देतांना सांगितले कि, जे नाले वारंवारं खराब होतात अशा नाल्यांची सफाई वर्षभर करण्यात येते. तर विशेष स्वच्छता मोहीम ही मार्च महिन्यात राबविण्यात येते. ज्या झोन अंतर्गत जे नाले आहेत त्या नाल्यांची सफाई त्या झोनच्या माध्यमातून करण्यात येते.

मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके यांनी सांगितले कि, मोमीनपुरा भागात बोरियापुरा मस्जिद समोर नाल्यावर अतिक्रमण करून मोठमोठया बिल्डिंग बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे

नाल्याची सफाई करता येत नाही आणि नाला ब्लॉक झालेला आहे. याबद्दल काहीही कार्यवाही केली जात नाही. यावर डॉ.दासरवार यांनी सांगितले की संबंधित झोन अंतर्गत अतिक्रमण केलेल्या लोकांना लेखी नोटीस देण्यात येईल.

मा.सभापती यांनी निर्देशित केले कि संबंधित झोनचे झोनल अधिकारी, सॅनिटरी इन्स्पेक्टर यांच्यामार्फत या भागाची पाहणी करण्यात करून रिपोर्ट दासरवार साहेबांकडे सादर करण्यात यावा जेणेकरून त्यावर कार्यवाही करता येईल. सफाई संबंधित जे कुणी अधिकारी असतील त्यांनी पाहणी करून ते अतिक्रमण काढावे.

मा.सदस्य श्री. येरवार यांनी सांगितले कि, धंतोली या भागात मेडिकल वेस्ट सर्वत्र पडलेले दिसून येते. या भागातून दुपारी कचरा उचलला गेला पाहिजे. चेंबरच्या वर सुध्दा गंदे वेस्ट टाकण्यात येतो. याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

मा.सदस्या श्रीमती लोणारे यांनी प्रभागात मोठया प्रमाणात डुकराचे आणि कुत्र्यांचे प्रमाण वाढलेले असून नागरिकांना खुप त्रास होतो असे सांगितले या अनुषंगाने मा.सदस्य श्री. चुटेले यांनी याबाबत वर्तमानपत्रात जाहीरात करून ओपन टेंडर करावे जेणेकरून या कामाकरिता अनेक लोक पुढे येतील असे सुचित केले.

मा.सभापती यांनी निर्देशित केले की मेडिकल वेस्टच्या अनुषंगाने धंतोली भागात झोन क्र. 6 गांधीबाग यांनी कार्यवाही करून संबंधित मा.सदस्यांना कळवावे. शहरातील नाल्याची सफाई रेग्युलर करण्यात यावी. जेणेकरून पावसाळयाच्या दिवसांत त्रास होणार नाही. कच–याची उचल करणा–या गाडयांची स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे दिसून आले असून तुटलेल्या स्थितीतील गाडी जेथे ड्रायव्हरला बसायला सुध्दा जागा नव्हती अशा गाडीद्वारे कच–याची उचल केली जात आहे. अशा गाडयांच्या बाबतीत लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी. शहरात कुत्र्यांचे प्रमाण वाढलेले आहे त्याचा नागरिकांना त्रास होत आहे करिता याअनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी. तसेच डुकरांच्या बाबतीत, ज्या नागरिकांकडे डुकरे पाळली जातात त्यांना याबाबत नोटीस देवून डुकरांचे स्थलांतर शहराच्या बाहेर करण्यात यावे. फॉगिंगच्या संदर्भात, महिन्याभरात एकदा फॉगिंग मशीन प्रभागातून फिरविली जाते ती 15 दिवसातून एकदा कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने फॉगिंग मशीनची व्यवस्था करण्यात यावी. ड्रेनेज सिस्टिम ही टेक्निकल बाब असून हा विषय इंजिनिअररिंग वर्क्सशी संबंधित आहे करिता समितीच्या मा. सदस्यांनी आयुक्तांशी चर्चा करून हा विषय आरोग्य विभागाकडून काढून पी.डब्लू.डी. विभागाकडे देण्यात यावा असे मा. सभापती यांनी सुचित करून सभा समाप्तीची घोषणा केली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती**

**वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची ~~मंगळवार~~ दिनांक 14.11.2017 रोजी दुपारी 2.00 वाजता मा.सभापती वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती यांच्या कक्षात भरलेल्या आढावा सभेचा अहवाल.**

सभेत मा.सभापती श्री.मनोज चापले, मा. उप सभापती श्री. प्रमोद कौरती, मा.सदस्य श्री. लखन येरवार, मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे, मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके, मा.सदस्या श्रीमती विशाखा बांते, मा.सदस्या श्रीमती रूपा रॉय, मा.सदस्या श्रीमती नसीम बानो आणि विभागाकडून आरोग्य अधिकारी(स्वच्छता) डॉ.दासरवार, आरोग्य अधिकारी डॉ.चिव्हाणे, मलेरिया फायलेरिया अधिकारी, सर्व झोनचे झोनल अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरूवात केली.

<u>विषय क्र. 1</u>:– दि.12.10.2017 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवाहीला मंजुरी प्रदान करण्यात आली.

<u>विषय क्र. 2</u>:– म.न.पा.ठराव क्र. 123 दि. 16.10.2017 अन्वये नागपूर शहरात डेंग्युमुळे नागरिक आजारी पडत आहे. यावर उपाययोजनासाठी चर्चा करतांना विभागाला रिपोर्ट सादर करावयाचा होता त्या अनुषंगाने संबंधितांकडून खालीलप्रमाणे रिपोर्ट सादर करण्यात आला.

## <u>हत्तीरोग व हिवताप विभाग प्रमुखांचा अहवाल</u>

नागपूर शहरात जानेवारी २०१७ ते अक्टोबर २०१७ पर्यंत संशयीत डेंग्यु रूग्णांचे ८९७ रक्तजल नमुने तपासणीस्तव प्राप्त झालेले आहे. त्यापैकी १३७ रक्तजल नमुने डेंग्यु दुषित आढळून आलेले आहेत. यात कोणताही रूग्ण डेंग्युने मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले नाही. सध्या डेंग्यु रूग्णांची संख्या आटोक्यात आहे. ऑक्टोबर महिण्यात ७२ डेंग्यु रुग्ण आढळुन आले.

शहरातील कोणत्याही प्रभागामध्ये डेंग्युचा उद्रेक असल्याचे आढळून येत नाही. किटकजन्य आजारावर नियंत्रण करण्याकरीता विभागाच्या वतीने खालीलप्रमाणे कार्यवाही सातत्याने राबविण्यात येत आहे.

१. <u>साप्ताहीक अळीनाशक फवारणी</u> :–

या कार्यक्रमाअंतर्गत उपब्लध असलेल्या अळीनाशक औषधाची फवारणी दर आठवडयाला ठरलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक वार्डात केली जाते. या फवारणी कार्यक्रमात साचलेल्या पाण्याचे डबके, नाल्याचे, गटाराचे चेंम्बर, सेप्टीक टॅक व इतर ठिकाणी अळीनाशकाची फवारणी केली जाते.

२. **डासोत्पती स्थानाचा शोध घेणे व ती नष्ट करणे** :—

या कार्यक्रमाअंतर्गत फवारणी झाल्यानंतर त्यात वार्डा मध्ये प्रत्येक घराला भेट देऊन पाणी साठवण्याची भांडी उदा. टाके, रांजन, माठ, हौद, टायर, कुलर इत्यादी तपासून त्या मध्ये डासाचे अळया आढळल्यास टेनोफॉस औषोद्याच्या मदरसोलूशनचे काही थेंब टाकुन किंवा पाणी उघडयावर फेकून देऊन अळया नष्ट केल्या जातात व या अळयापासून तयार होणारे डांसामुळे पसरणाऱ्या रोगा बद्दलची माहिती जनतेस देऊन जनजागरणाचे कार्य केल्या जाते.

३. **रात्रकालीन सर्व्हेक्षण** :—

हत्तीरोगाचे रक्त नमुणे हे रात्रीचे वेळी ८.३० नंतर घेतल्या जातात. हे सर्व्हेक्षण हत्तीरोग निरीक्षकाचे देखरेखी खाली प्रत्येक झोन मध्ये स्लम भागात अथवा ज्या भागात हत्तीरोगाचे नविन रूग्ण सापडले असतील त्या ठिकाणी वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता व क्षेत्र कर्मचारी यांचे मदतीने केले जाते.

४. **जिवशास्त्रीय कार्यक्रम** :—

या कार्यक्रमाअंतर्गत प्रत्येक वार्डात उपलब्ध असलेल्या विहिरी मध्ये गप्पीमासे पैदांस केंद्र तयार करण्यात आली आहे. गप्पीमासे डासांच्या अळया सेवन (भक्षण) करतात. नागरिकांना मागणीनुसार नागरिकांना त्यांचे घरातील विहिरीत अथवा टक्यात गप्पीमासे टाकण्यासाठी दिले जाते. वापरीत नसलेल्या विहिरीत व मोठया डबक्या मध्ये गप्पीमासे सोडण्याची कार्यवाही या विभागातर्फे करण्यात येते.

५. **धुर फवारणी कार्यक्रम** :—

ज्या प्रभागामध्ये रोगाचा उद्रेक होतो त्या प्रभागामध्ये धुरफवारणी कार्यक्रम राबविण्यात येतो.

६. **हत्तीरोग रूग्ण शोध मोहिम व पायधुनी उपचार** :—

दरवर्षी साधारणत: सप्टेंबर — आक्टोंबर या महिन्यात प्रत्येक वार्डातील जनप्रतिनीधी, पूढारी, समाजिक कार्यकर्ते, शिक्षक, आंगणवाडी कार्यकर्ता इत्यादिंच्या मदतीने नविन हत्तीरोग रूग्णाची अंडवृध्दी रूग्णाची माहिती संकलित केली जाते. नविन हत्तीरोग रूग्ण आढळल्यास त्यांचे नांव हत्तीरोग रूग्णाचे यादीत समाविष्ट करून त्याला औषोधोपचार केल्या जातो व हत्तीरोग झालेल्या भागाची निगा कशी ठेवावी, सकाळ संध्याकाळ तो भाग कसा धुवावा व हाता पायांचा व्यायाम कसा करावा या बद्दलचे प्रशिक्षण त्या रूग्णास दिले जाते.

७. **वापरण्यात येणारा औषधी साठा** :—

पुढिल औषधीचा वापर करुन अळीनाशक फवारणी केल्या जाते.

१. अबेट २. MLO ऑईल ३. निम ऑईल ४. बी.टी.आई. इत्यादी.

**हिवताप विभागाचा उद्देश** :—

१. हिवताप, डेंग्यु, चिकन गुनिया, जे.ई. व चंडीपुरा रूग्ण संख्येत वाढ न होवू देणे.
२. दुषित हिवतापाच्या रूग्णास त्वरीत उपचार देणे.

३. सध्या उपलब्ध असलेली आरोग्य सेवा अधिक बळकट करणे.

कृपया माहितीस्तव सविनय सादर.

हिवताप व हत्तीरोग अधिकारी,
नागपूर महानगरपालिका,नागपूर.

त्यानंतर मा.सदस्या श्रीमती आशा ऊईके यांनी मोमीनपुरा प्रभागात डेंगुचे पेंशट मोठया प्रमाणात असून बोअरवेलला घाण पाणी येत आहे. तसेच बकरामंडी वस्तीच्या मधोमध असल्यामुळे सर्वत्र रोगराई पसरत आहे. त्या भागातून बकरामंडी हटविण्यात यावी. डेंगु रोगावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून विभागाने या ठिकाणी जनजागृतीचे कार्यक्रम राबवावे तसेच आरोग्य विषयक सुविधेच्या दृष्टीने जास्तीत जास्त कॅम्प लावावे असे सुचित केले.

मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे यांनी प्रभागाता जनजागृती विषयक कोणते कार्यक्रम घेण्यात येतात याची माहिती मा.सदस्यांना राहत नाही. फवारणी करणारे कर्मचारी अर्धा दिवसातून निघून जातात त्यांच्याकडे औषधे राहत नाही असे सांगितले.

मा.सभापती यांनी या अनुषंगाने निर्देशित केले की फायलेरिया–मलेरिया अधिका–याने त्या त्या भागात सर्व्हे करून तेथे सुध्दा काय उपाययोजना करता येतील त्याप्रमाणे संबंधित कर्मचा–यांना निर्देश दयावे.

विषय क्र. 3:– म.न.पा.ठराव क्र. 124 दि. 16.10.2017 अन्वये महानगरपालिकेच्या सर्व कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी, नगरसेवक व त्यांचे कुटुंबीय यांना आरोग्य विमा सुरक्षा प्रदान करण्याकरिता चर्चा केली असता मा.सदस्या श्रीमती रूपा रॉय यांनी सांगितले की आरोग्य विषयक समस्या अचानक निर्माण झाली तर त्याला सामोरे जातांना खुप अडचणींना तोंड दयावे लागते त्याकरिता कॅशलेस विमा काढणे आजच्या घडीला खुप आवश्यक झाले आहे. करिता महानगरपालिकेच्या सर्व कर्मचारी, अधिकारी, पदाधिकारी, नगरसेवक व त्यांचे कुटुंबीय यांना आरोग्य विमा सुरक्षा प्रदान करणे गरजेचे झालेले आहे. या अनुषंगाने विभागामार्फत ही योजना राबविण्यात यावी असे त्यांनी सुचविले.

तद्नंतर डॉ.चिव्हाणे यांनी सांगितले की ही अत्यंत कल्याणकारी योजना आहे. ही योजना समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येईल. या अनुषंगाने विमा कंपनीशी विचारविमर्श करून संपुर्ण माहिती घेवून आराखडा तयार करण्यात येईल.

मा.सभापती यांनी या अनुषंगाने निर्देशित केले की या विषयावर संपुर्ण माहिती घेवून तसेच यावर किती खर्च अपेक्षित आहे या माहितीसह पुढच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात यावा.

विषय क्र. 4:– म.न.पा.ठराव क्र. 129 दि. 16.10.2017 अन्वये नागपूर शहरातील सफाई कामात कामचुकारपणा तसेच सफाई कामगारांच्या गैरहजेरीबाबत चर्चा केली असता मा.सदस्या श्रीमती नसीम बानो यांनी माहिती देतांना सांगितले कि, प्रभाग क्र.3 च्या या अनुषंगाने तक्रारी आहेत. जे सफाई कर्मचारी कामावर येत नाही त्यांची हजेरी लावून पगार काढण्यात येतो. मागील 3 महिन्याचे मस्टर आणि हजेरी रजिस्टर बोलावून पडताळणी केली असता जे गैरहजर होते ते मस्टरप्रमाणे हजर होते. 38 ऐवजदार पैकी 36 कर्मचारी गैरहजर होते. दि.10.10.17 ला 74 कर्मचा–यांपैकी 12 गैरहजर होते आणि 20 कर्मचारी गायब होते. हे चार महिन्यापासून चालू आहे आणि मस्टरनुसार पुर्ण कर्मचा–यांचा पगार काढण्यात येतो.

आरोग्य अधिकारी श्री.दासरवार यांनी सांगितले कि, 10 तारखेला 74 ऐवदारापैकी 32 परमानंट ऐवजदार आहेत त्यापैकी 20 हजर होते आणि 11 गैरहजर होते आणि 1 हेडक्वार्टरला कामावर होता. मा.सदस्यांची तक्रार होती 16 कर्मचारी गैरहजर राहतात तरी त्यांचा पगार काढण्यात येतो. मी ज्या दिवशी गेलो त्यावेळेस 74 पैकी 54 ऐवजदार हजर होते आणि जे गैरहजर होते त्यांचा पगार काढण्यात आलेला नाही. 3 महिन्याचा रेकार्ड चेक करून त्यांचे समाधान करून देण्यात आले आहे. आता जीपीएस सिस्टीम लागू करण्यात येत आहे. मा. सदस्यांच्या प्रभागापासून सुरूवात केली आहे त्याठिकाणी जीपीएस सिस्टीम लावलेली आहे त्याचा डेमो सुरू आहे असेही त्यांनी सांगितले.

मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे यांनी सुचीत केले की त्यांच्या प्रभागात सफाई कर्मचा–यांची कमतरता आहे आणि सातत्याने ओरड केल्यानंतर सुध्दा सफाई कर्मचारी देण्यात आलेले नाही. लाड कमेटीनुसार जी भरती करण्यात येत आहे. त्याचे समप्रमाणात विभागणी करण्यात यावी.

मा.सभापती यांनी निर्देशित केले की, ज्या प्रभागात सफाई कर्मचारी कमी आहेत त्याप्रमाणे जास्तीत जास्त कर्मचारी देण्याची विभागाकडून कार्यवाही करण्यात यावी. तसेच नियमितपणे प्रत्येक हजेरी स्टॅन्डमध्ये क्रास चेकिंग सुरू करावी व गैरहजर असलेल्या सफाई कर्मचा–यांवर किंवा हजेरी घेणारे जमादार, स्वास्थ्य निरीक्षकावर प्रशासकीय कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

त्यानंतर मा.सभापती यांनी मागच्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशासंदर्भाने सुचित केले की नाल्याची सफाई रेग्युलर करण्यात यावी. जेणेकरून पावसाळयाच्या दिवसांत त्रास होणार नाही. फॉगिंगच्या संदर्भात, महिन्याभरात एकदा फॉगिंग मशीन प्रभागातून फिरविली जाते ती 15

दिवसातून एकदा कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने फॉगिंग मशीनची व्यवस्था करण्यात यावी. ड्रेनेज सिस्टिम ही टेक्निकल बाब असून हा विषय इंजिनिअररिंग वर्क्स्‌शी संबंधित आहे करिता समितीच्या मा.सदस्यांनी आयुक्तांशी चर्चा करून हा विषय आरोग्य विभागाकडून काढून पी. डब्लू.डी. विभागाकडे देण्याविषयी कार्यवाही करण्यात यावी. दवाखान्याच्या कामकाजाच्या संदर्भाने झालेल्या चर्चेत डॉ. चिव्हाणे यांनी माहिती दिली, म.न.पा. दवाखान्यात मेडीकल ऑफीसरची कमतरता आहे त्यातल्यात्यात आता बरेच मेडीकल ऑफीसर सेवानिवृत्त झाल्यामुळे या पदाची भरती करण्याच्या अनुषंगाने सेवानिवृत्त झालेल्या डॉक्टरांना मानधनावर घेण्याचे प्रस्तावित केले आहे. स्पेशालिस्ट डॉक्टर सुध्दा घेण्यास मान्यता मिळाली आहे. एनयुएचएमच्या धर्तीवर सुध्दा मेडीकल ऑफीसर घेण्याची तयारी आहे. टाटा ट्रस्ट कडून कॅन्सर ट्रिटमेंटकरिता मदत मिळणार आहे. 26 दवाखाने एनयुएचएमच्या धर्तीवर सुसज्ज करण्याच्या अनुषंगाने याचा सर्व्हे करण्यात येत असून पायलेट प्रोजेक्ट म्हणून 8 दवाखाने हाती घेतले आहे. त्यापैकी 3 दवाखान्याचा सर्व्हे पुर्ण झाला आहे असेही त्यांनी सांगितले.

शेवटी कनक एजन्सीमार्फत प्रभागात कर्मचा–यांवर नियंत्रण ठेवण्याच्या हिशेबाने 2 सुपरवायजर नेमण्यात यावे आणि प्रभागातील सफाई विषयक समस्येच्या अनुषंगाने सुपरवायजर किंवा झोनल अधिका–याकडून माहिती घेवून समस्यांचे निराकरण करण्यात यावे असे मा. सभापती यांनी सुचित करून सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
नागपूर महानगरपालिका,नागपूर

सभापती
वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती

म.न.पा. ठराव क्रमांक 8 दिनांक 20.30.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30.3 नुसार गठीत वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची सभा गुरुवार दिनांक 7.12.2017 रोजी दुपारी 2.00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात संपन्न झाली त्या सभेचे इतिवृत्त.

सभेती मा. सभापती वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती श्री मनोज चापले, मा. उपसभापती श्री प्रमोद कौरती, मा. सदस्य श्री लखन येरवार, मा. सदस्य श्री विजय चुटेले मा. सदस्या श्रीमती भावना लोणारे, मा. सदस्या श्रीमती वंदना चांदेकर विशेष आमंत्रीत सदस्य श्री मनोज सांगोळे उपस्थित होते.

सभापती यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

सभेतील विषय पत्रिकेवरील विषय क्रमांक 1 नुसार दिनांक 14.11.2017 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवाहीला मंजूरी मिळणे बाबत विषया मंजूरी प्रदान करण्यात आली.

विषय क्रमांक 2 नुसार म.न.पा. ठराव क्रमांक 108 दिनांक 16.10.2017 नुसार कनक रिसोर्समॅनेजमेंट कंपनीला देण्यात आलेला कंत्राटबाबत चर्चा या विषयावर चर्चा करण्यात आली विभागातर्फे या संबंधात माहीती देण्यात आली. हा कंत्राट 2007 मध्ये सुरु करण्यात आले आहे 16 मे 2008 मध्ये काम सुरु करण्यात आले. हा करार 10 वर्षा करीता करण्यात आला. यांना सेटअप करीता 9 महिन्याची वेळ देण्यात आली होती. मे 2018 पर्यन्त करार आहे.

या वेळी सदस्यांनी यापुर्वी सभेत ड्रायव्हर ,लेबर,सुपरव्हाईजर किती पद ठेवणार आहे या संबंधात पूर्ण माहिती देण्यात येणार होती, कंपनी ने पेपर मध्ये टेंडर होण्यापूर्वी प्रसिध्द केले हे योग्य नाही ह्या संबंधात सर्व नियोजन हे महानगरपालिकेचे राहिले पाहिजे महानगरपालिकेचे कोणतेही कर्मचारी भरती करण्यास तयार असते असे निवेदन सभापती यांनी सभेत केले

मा. सदस्य श्री सांगोळे यांनी कंत्राट देण्यापुर्वी सर्व भागात आऊटर भागात किती कर्मचारी राहतील या संबंधात माहिती मिळाली तर योग्य होईल अशी विनंती केली तक्षशिला नगर, कडू लेआऊट, के.जी. कब्रीस्थान, कपील नगर, काशीनगर, नालंदानगर, खाडे लेआऊट तारेकरनगर, स्वामीनगर, नविन म्हाडा ह्या सर्व आऊटर वार्डात किती कर्मचारी मिळणार आहे साफसफाईची व्यवस्था कशी होईल याबाबत पुर्ण नियोजन पहले सांगण्यात यावे. यावर आरोग्याधिकारी यांनी सांगितले आपल्याकडे कर्मचारी आहे 106 लोकांची भर्ती करण्यात आलेली आहे 100 लोकांची होणार आहे. जो आऊटर एरिया आहे त्या करीता त्यात अतिरिक्त कर्मचारी ठेवण्याकरीता सांगण्यात आलेले आहे. अतिरिक्त गाडी देण्यात येणार

आहे. कचरागाडी [illegible] सिटी नाही ती देण्यात यावी. कचरावाले एक दिवस आड येतात यावर [illegible] करण्यात यावे असे निर्देशीत करण्यात आले.

[illegible] विभागाने फॉगींग मशीनीचे शेड्युल नगरसेवकांना दिलेले नाही [illegible] त्यांचे निश्चित कार्यक्रम तयार करुन ते देण्यात यावे. [illegible] आवश्यक आहे त्यानुसार नियोजन करण्यात यावे. कामाचे [illegible] नगरसेवकाकडे फिरविले पाहिजे. काही कर्मचारी नगरसेवकांना 3 [illegible] एस.एस.डबलु.एसएफडब्लु यांचे नाव फोन नंबरसह देण्यात यावे [illegible] भेटण्यास सांगावे अशी सुचना मा. नगरसेवकातर्फे करण्यात आली [illegible] कार्यवाहीचे निर्देश सभापतीव्दारे करण्यात आले.

आता जे [illegible] येणार आहे त्यात उत्तम अधिकारी ठेवण्यात यावे. जे ही [illegible] कार्यवाही करण्यात आली पाहिजे. त्यांचा मुख्य अधिकारी [illegible] त्यांना [illegible] देवून कार्यवाही करण्याचे अधिकार त्यांना दिले पाहिजे अश्या सुचना मा. सदस्यातर्फे सभेत करण्यात आल्या.

वर्कशॉप ची गाडी येते त्याचे टायमिंग केव्हा येते केव्हा निघते किती वेळ काम करते याची नोंद आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांने ठेवावी असे सभेत आरोग्याधिकारीतर्फे अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या.

आरोग्य विभागाच्या झोनल अधिकारी ह्यांना वार्डात फिरावे लागते मिटींग अटेंड करावी लागते ह्या लोकांना गाडी अलॉटेड करुन देण्यात यावी अशी मागणी सदस्यांतर्फे करण्यात आली यावर उचित कार्यवाहीचे निर्देश सभापतीव्दारे देण्यात आले.

विषय क्रमांक 3 म.न.पा. दवाखान्याच्या कामाकाजाबाबत चर्चा या विषयावर चर्चा करण्यात आली.यावर सदस्यांव्दारे दवाखान्याच्या दर्शनीभाग उत्तम ठेवण्याबाबत डॉक्टरच्या वेळा ते दवाखान्यात बसतात की नाही या बाबत अचानक निरीक्षण करण्यात यावे आवश्यक तेथे कठोर कार्यवाही करण्यात यावी अश्या सूचना करण्यात आल्या. यावर महानगरपालिकेच्या दवाखान्यासंबंधात विभागातर्फे माहिती देण्यात आली यात 52 दवाखाने 3 ईडीआर आहे नुकतेच मा. मुख्यमंत्री यांचे उदयोगपती टाटा यांचे नागपूर महानगरपालिकेच्या दवाखान्याचे आधुनिकीकरण करण्या संबंधात करार करण्यात आलेला आहे. सुरवातीत या करीता 8 दवाखाने निवडले आहे इंदिरागांधी पाचपावली नंदनवन डिप्टीसिग्नल फुटाळा सिताबर्डी कपीलनगर जयताळा हे दवाखान्याचे नविनीकरण होणार आहे. पुढे आणखी दवाखाने घेण्यात येतील असे 25 दवाखाने होतील. फिरते दवाखाने 1 सुरु आहे मा. सदस्य श्री सांगोळे यांनी सांगीतले की त्यांचे क्षेत्रात 2 एकर जागा दान मिळाली आहे त्यावर आधुनिक दवाखाना उघडण्यात यावा. विभागातर्फे शववाहीका शवपेटी चे लवकरच प्राप्त होणार आहे. स्वच्छता अभियांना अंतर्गत [illegible] ॲप लोड करुन त्यानुसार माहिती देण्याची कार्यवाही करण्यासंबंधात वर्णन करण्यात आले. नाल्याची

साफसफाई ठेवण्याबाबत मा. सदस्यांतर्फे सुचविण्यात आले. शहरातील लावारीस कुत्रे पकडण्याच्या संदर्भात तातडीने कार्यवाही वेळोवेळी मा. सदस्यांच्या अपेक्षेप्रमाणे व्हावी असे सुचविण्यात आले. मा. सदस्यांनी मांडलेल्या समस्यांवर तातडीने कार्यवाही व्हावी नियोजनात त्यांनी सुचविलेल्या मुद्यांचा समावेश करण्यात यावा असे मा. सभापती यांनी निर्देश देवून सभेचे कामकाज समाप्त केले.

| | |
|---|---|
| निगम सचिव | सभापती |
| नागपूर महानगरपालिका,नागपूर | वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती |

**म.न.पा. ठराव क्र. 8 दिनांक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30(3) नुसार गठीत वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीची सभा गुरुवार दि. 11/01/2018 रोजी सकाळी 11.00 वाजता सिव्हील कार्यालयातील स्व.डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा संक्षिप्त वृतांत.**

**सभेत मा.सभापती, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती श्री.मनोज चापले, मा.उपसभापती श्री. प्रमोद कौरती, मा.सदस्य श्री.लखन येरवार, मा.सदस्य श्री.विजय चुटेले,मा.सदस्या श्रीमती विशाखा बान्ते, मा.सदस्या श्रीमती भावना लोणारे, मा.सदस्या श्रीमती आशा उईके, मा.सदस्या श्रीमती वंदना चांदेकर मा.उपायुक्त श्रीमती रंजना लाडे, मा.अति. उपायुक्त श्री.दांडेगावकर, मलेरिया फायलेरीया अधिकारी श्रीमती थोटे, पशुचिकित्स् अधिकारी डॉ.महल्ले, वैद्यकीय अधिकारी डॉ.जोशी, वैद्यकीय अधिकारी डॉ.खान, झोनल अधिकारी झोन क्र 1 ते 10 व संबंधित इतर अधिकारीवर्ग व कर्मचारी सभेत उपस्थित होते.**

मा.सभापती यांनी सभेची कार्यवाहीस सुरुवात केली सभेच्या सुरुवातीस विषयपत्रिकेवरील विषयाला सुरुवात केली.

1. दिनांक 07.02.2017 रोजी झालेल्या सभेच्या कार्यवाहीला मंजूरी मिळणेबाबत समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

2. जन्म मृत्यू विभागाच्या कामकाजाच्या संदर्भात मा.उपायुक्त श्रीमती रंजना लाडे यांच्यातर्फे सविस्तर माहिती देण्यात आली त्यामध्ये मा.सभापती यांच्याव्दारे निर्देशित करण्यात आले की, जन्म मृत्यु विभाग हा आरोग्याशी संबंधित असल्यामुळे जन्म मृत्युचा दाखला देण्याची प्रक्रीया ही सोपी करण्याच्या अनुषंगाने जन्म मृत्यु विभागाच्या माध्यमातुन शासनाव्दारे जी अद्यावत माहिती आली असेल तर त्याला प्रसार माध्यमांच्या माधमातुन प्रकाशित करावे. अर्जदाराने ज्या दिवशी अर्ज केला त्याच दिवशी त्याला जन्म मृत्युचा दाखला देण्याची कार्यवाही करावी.

मलेरिया फायलेरीया अधिकारी श्रीमती थोटे यांनी त्यांच्या विभागामार्फत करण्यात येणाऱ्या कार्यवाही संदर्भात माहिती देतांना सांगितले की ज्या भागामध्ये पाणी साचते किंवा जिथे लार्व्ही ही डास अळी आढळतात तेथे फायलेरिया विभागाचे कर्मचारी जातात त्यांच्यावर दंडात्मक करवाई करण्याच्या अधिकार महानगरपालिकेला नसल्यामुळे वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समितीच्या मार्फत दंडात्मक कारवाई करण्याचे अधिकार देण्यात यावे, त्या अनुषंगाने फायलेरिया विभागातर्फे उपविधी तयार करण्यात आलेली आहे. जे राहते घर आहे त्यांच्या घरी डासअळ्या आढळुन आल्यास त्यांना 100/– रुपये शुल्क आकारणार आहे. शुल्क आकारल्यानंतरही त्यांनी मार्गदर्शक सुचनेंचे पालन न केल्यास त्यांना प्रति दिवस 20/– रु शुल्क आकारण्यात येईल.

व्यवसायिक ठिकाणी डासअळया आढळुन आल्यास त्यांना 500/– रुपये शुल्क आकारणार आहे शुल्क आकारल्यानंतरही त्यांनी मार्गदर्शक सुचनेंचे पालन न केल्यास त्यांना प्रति दिवस 100/– रु शुल्क आकारण्यात येईल.

दवाखाने, खाजगी संस्था, सरकारी कार्यालय, शाळा, महाविद्यालय, त्यांच्याकडुन 500/- रुपये शुल्क घेण्यात येईल, शुल्क आकारल्यानंतरही त्यांनी मार्गदर्शक सुचनेंचे पालन न केल्यास त्यांना प्रति दिवस 200/- रु शुल्क आकारण्यात येईल.

फायलेरिया विभागाने तयार केलेल्या उपविधीला वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती तर्फे एकमताने मंजूरी प्रदान करण्यात आली.

3. म.न.पा. दवाखान्याच्या कामकाजाच्या संदर्भात वैद्यकीय अधिकारी यांनी सविस्तर माहिती दिली. रुग्णवाहिका खासदार फंडातून घेण्याचे मान्य केले आहे जे.सी.बी. टिप्पर व पोकलॅन्ड खरेदीकरण्यासाठी शासनला पत्र पाठविण्यात आले आहे. त्यामध्ये मा.सभापती यांनी निर्देशित केले की, दाजी हॉस्पीटल, शहीद चौक येथील दवाखान्यांची स्थिती अतिशय दयनीय आहे तेथे दरवाज्याला कोडें नाही, लाईटची व्यवस्था नाही, ज्या दवाखान्यांची स्थिती अतिशय दयनिय आहे त्या संदर्भात सोमवार दि. 15.01.2018 रोजी सर्व समिती सदस्य व अधिकारी समवेत दौरा घेण्यात येईल त्याचबरोबर आरोग्य विभागातर्फे महानगरपालिकेच्या दवाखान्याच्या देखभाल करण्यासंदर्भात निविदा काढण्याची प्रक्रीया लवकरात लवकर करण्यात यावी.

मा.सदस्या श्रीमती आशा उईके, यांनी सांगितले की, माझ्या प्रभागात असलेल्या मोमिनपुरा येथील दवाखान्यांची स्थिती ही अतिशय दयनिय आहे तेथील दवाखाना हा किरायाच्या रुम मध्ये आहे, तेथे पेशंट करीता स्ट्रेचर सुध्दा नाही. रात्रीच्या वेळी तेथे असामाजिक तत्वाचा वावर असतो त्यामुळे तेथे सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात यावे. तसेच महिला सफाई कर्मचाऱ्यांकरीता शौचालयाची व त्यांना बसण्याकरीता रुम्स् उपलब्ध करुन देण्यात यावे. मोकाट कुत्र्यांचा त्रास आमच्या प्रभागात मोठया प्रमाणात वाढला आहे कुत्रे कब्रस्तान मधील कबर खोदत आहे त्यावर विभागातर्फे त्वरीत कारवाई करण्यात यावी.

पशुचिकित्सा अधिकारी डॉ. महल्ले यांनी मोकाट कुत्र्यांच्या संदर्भात माहिती देतांना सांगितले की, मोकाट कुत्र्यांना पकडुन हे दुसऱ्या ठिकाणी नेता येत नाही त्यांना पकडुन त्यांची नसबंदी करुन त्यांना मुळ जागेवरच सोडावे लागते त्याचप्रमाणे रॅबीज झालेला कुत्रा हा 10 दिवस जागतो तो नैसर्गिक रित्या त्याला मृत्यु येईपर्यंत त्याला वेगळया ठिकाणी ठेवणे असा नियम आहे या सर्व प्रणालीकडे प्राणीप्रेमी संघटना लक्ष ठेवुन आहे. कुत्र्यांची नसबंदी करण्याकरीता स्थायी समितीने जे दर ठरवुन दिले आहे त्याप्रमाणे सेंटर सुरु करण्यात आले आहे. ज्या ज्या कुत्र्यांना पकडले आहे त्यांना त्याच ठिकाणी सोडतांना त्या परिसरातील प्राणी प्रेमी संघटनेच्या प्रतिनिधींची स्वाक्षरी त्यावर घ्यावी लागते. यंत्रणा अपुरी पडत आहे. सद्यस्थितीत एकच डॉक्टर कार्यरत आहे. ऐरिया वाईज डॉक्टरांची नियुक्ती करणे हे आकृतीबंधामध्ये प्रपोज केले आहे. सद्यस्थितीत कंत्राटी पध्दतीवर 4 डॉक्टरांची नियुक्त करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

4.स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केलेल्या कार्यवाही संदर्भात अति.उपायुक्त श्री.दांडेगावकर यांनी सविस्तर माहिती देतांना सांगितले की स्वच्छ भारत अभियान ही एकुण 4000 गुणांची परिक्षा आहे त्यामध्ये भारतातल्या एकुण 4041 शहरांचा तसेच अमृत योजनेमध्ये केंद्र सरकार आणि राज्य

शासन ज्या शहराला अमृत सिटी म्हणतात त्यांचा समावेश स्वच्छ भारत अभियान मध्ये राहणार आहे. लोकसंख्येनिहाय त्याचे 4 भाग केले आहे. कलेक्शन आणि ट्रान्सपोर्टेशन संदर्भात कनकच्या 126 गाडया आणि 536 हातगाडया मध्ये पार्टीशन करुन हिरवा आणि निळा रंग देण्यात आलेला आहे. कचऱ्यांची वाहतुक ज्या गाडयामधुन होते त्या सर्वांना लॉकबुकचा रेकॉर्ड ठेवणे तसेच भांडेवाडी येथील डंम्पींग यार्डमध्ये एका दिवशी किती कचरा आला आहे त्याचे सुध्दा रेकॉर्ड ठेवण्यासंदर्भात निर्देशित करण्यात आले आहे. कच–याची विल्हेवाट म.न.पा कोणत्या पध्दतीने लावतात या संदर्भात 13 प्रश्न आहे. हागणदारी मुक्त शहर या संदर्भात 420 गुण आहे. स्वच्छ सर्वेक्षण संदर्भात जी जाहिरात दयायची आहे ते सुध्दा शासनाने ठरवुन दिले आहे आतापर्यंत 11,500 च्या वर पब्लीक टॉयलेट बांधण्यात आले आहे त्यामध्ये आता फिडबॅक मशीन सुध्दा लागणार आहे. महानगरपालिकेच्या 15 अधिका–यांनी जर ट्रेनिंग घेतले तर त्यामध्ये 16 गुण मिळतात ते सर्व गुण नागपूर महानगरपालिकेला मिळालेले आहे. जी माहिती आपण शासनाला पाठविणार आहे ती माहिती बरोबर असायला पाहिजे त्यामध्ये खोटी माहिती आढळल्यास त्यामध्ये निगेटीव्ह मार्कस् देण्यात आले आहे.

मा.सदस्य श्री.लखन येरवार यांनी सुचित केले की, सरस्वती नगर, तकीया येथे बालवाडी व अंगनवाडी येथे आर्यन व इलेक्ट्रॉनिक पावडर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही आरोग्य विभागातर्फे करण्यात यावी.

सरतेशेवटी मा.सभापती यांनी निर्देशित केले की, झोनल अधिकारी यांच्या कामाचा व्याप बघता त्यांना वाहन उपलब्ध करण्यात यावे तसेच ड्रेनेज सिस्टीमचे काम हे आरोग्य विभागाचे काढुन पी. डब्लु.डी. विभागाच्या इंजिनिअरींग विंगकडे देण्यासंदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा करुन त्यावर निर्णय घेण्यात यावे. पावसाळा येण्यापुर्वी शहरातील सर्व मोठया व छोटया नाल्यांची साफसफाई करण्यात यावी यासाठी येणा–या लाड कमेटी अंतर्गत वारसदारांना सफाई मजदूरच्या पदावर नियुक्ती देतेवेळी त्यांची मुख्यालयात नियुक्ती दाखवुन नाला गॅग पुर्वी प्रमाणे केंद्रीय पातळीवर नियंत्रण राहील याप्रमाणे सुरु ठेवावी. फॉगिंग करण्याकरिता फायलेरिया विभागाने झोननिहाय नव्याने शेडुल तयार करुन कोणताही ऐरिया सुटणार नाही याची काळजी घ्यावी, यानंतर मा.सभापती यांनी सभा समाप्तीची घोषणा केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती